महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

# सन १९२६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ११

# हिंदू धार्मिक विधि उपलब्धि अवैधता अधिनियम, १९२६

(१३ नोव्हेंबर, २००६ पर्यंत सुधारित)

## Bombay Act No. XI of 1926

# The Invalidation of Hindu Ceremonial Emoluments Act, 1926

*(As modified upto 13th November, 2006)*

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, कोल्हापूर यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि
संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामुग्री महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित

२००६

(किंमत : रु. २-००)

# हिंदू धार्मिक विधि उपलब्धि अवैधता अधिनियम, १९२६

## अनुक्रमणिका

**उद्देशिका**

**कलमे**


| | | पृष्ठ |
|---|---|---|
| १. | संक्षिप्त नाव. ... ... ... | ३ |
| २. | व्याप्ती व प्रारंभ. ... ... ... | ३ |
| ३. | व्याख्या. ... ... ... | ३ |
| ४. | धार्मिक विधीबद्दल उपलब्धि मागण्याचा हक्क. ... ... ... | ३ |
| ५. | वंशपरंपरागत उपाध्यायास धार्मिक विधि करण्याच्या आपल्या जबाबदारीतून मुक्त होता येईल. ... ... .. | ३ |
| ६. | वंशपरंपरागत हिंदू उपाध्यायाच्या किंवा त्याच्या तबदीलदाराच्या हक्कास कोठपर्यंत बाध येतो. ... ... ... | ४ |

## सन १९२६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ११[1]

[हिंदू धार्मिक विधि उपलब्धि अवैधता अधिनियम, १९२६.]

[१३ ऑक्टोबर, १९२६]

**वंशपरंपरागत हिंदू उपाध्यायांकडून हक्काने मागण्यात येणाऱ्या उपलब्धीसंबंधात कायद्यात सुधारणा करण्यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** वंशपरंपरागत हिंदू उपाध्यायांकडून हक्काने मागण्यात येणाऱ्या उपलब्धी संबंधित कायद्यात सुधारणा करणे इष्ट आहे ;

**आणि ज्याअर्थी,** प्रस्तुत अधिनियम संमत करण्यासाठी भारत सरकार अधिनियम, कलम ८०-अ (३) अन्वये आवश्यक असलेली गव्हर्नर जनरल यांची पूर्वमंजुरी मिळविण्यात आली आहे ; **त्याअर्थी,** याअन्वये पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :--

१. या अधिनियमास, हिंदू धार्मिक विधि उपलब्धि अवैधता अधिनियम, १९२६ असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

२. (१) तो, संपूर्ण मुंबई इलाख्यास लागू असेल. व्याप्ती व प्रारंभ.

(२) तो, दिनांक १ एप्रिल, १९२८ रोजी अंमलात येईल.

३. या अधिनियमात --

"धार्मिक विधि उपलब्धि" याचा अर्थ, कोणत्याही व्यक्तीस वंशपरंपरागत उपाध्याय किंवा त्याचा तबदीलदार म्हणून धार्मिक विधींबद्दल हक्काने मागता येणारी सर्व परिलब्धि, दक्षिणा व इतर कोणत्याही देय रकमा, असा आहे. व्याख्या.

४. धार्मिक विधि उपलब्धि हक्काने मागणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, जी कोणतीही हिंदू व्यक्ती त्यास धार्मिक विधि करण्यासाठी बोलावीत नसेल अशा हिंदू व्यक्तीकडून हक्क म्हणून कोणतीही धार्मिक विधि उपलब्ध मागण्याचा हक्क असणार नाही. धार्मिक विधीबद्दल उपलब्धि मागण्याचा हक्क.

५. हा अधिनियम अंमलात आल्यानंतर --

(१) गावातील धार्मिक विधीच्या वेळी उपाध्याय म्हणून काम करण्यासाठी पारिश्रमिक म्हणून कोणतीही इनाम जमीन जो धारण करीत नाही किंवा ज्यास कोणतीही नक्त नेमणूक मिळत नाही अशा प्रत्येक वंशपरंपरागत उपाध्यायास गावातील कोणताही रहिवासी गावातील एखाद्या धार्मिक विधीच्या वेळी उपाध्याय म्हणून काम करण्यास सांगेल किंवा ते करण्यासाठी बदली देण्यास सांगेल तेव्हा, असा उपाध्याय अशा धार्मिक विधीच्या वेळी उपाध्याय म्हणून काम करण्याच्या आपल्या जबाबदारीतून मुक्त झाला आहे, असे मानण्यात येईल. वंशपरंपरागत उपाध्यायास धार्मिक विधि करण्याच्या आपल्या जबाबदारीतून मुक्त होता येईल.

(२) धार्मिक विधीच्या वेळी उपाध्याय म्हणून काम करण्यासाठी पारिश्रमिक म्हणून जो इनाम जमिनी धारण करतो किंवा ज्यास नक्त नेमणूक मिळते अशा वंशपरंपरागत उपाध्यायाने जिल्हाधिकाऱ्याकडे लेखी अर्ज केला असता, आपल्या इनाम जमिनीवर पूर्ण महसूल आकार देण्यास, किंवा यथास्थिति, आपल्या नक्त नेमणुकीवरील हक्क सोडून देण्यास तो कबूल असल्यास, गावातील रहिवासी त्यास गावातील एखाद्या धार्मिक विधीच्या वेळी उपाध्याय म्हणून काम करण्यास सांगेल किंवा असे काम करण्यासाठी बदली व्यक्ती देण्यास सांगेल तेव्हा त्यास,

---

[1] उद्देश व कारणे यांचे निवेदन याकरिता पहा मुंबई शासन राजपत्र, १९२५, भाग पाच, पृ. ४८८; निवड समितीच्या अहवालाकरिता पहा - वरीलप्रमाणे, १९२६, भाग-पाच, पृ. ८१-८३; आणि परिषदेतील कार्यपध्दतीकरिता पहा-मुंबई विधानपरिषद वादविवाद, १९२५, खंड १६, व १९२० खंड १७ व १८.

अशा धार्मिक विधीच्या वेळी उपाध्याय म्हणून काम करण्याच्या त्याच्या जबाबदारीतून त्याची तशी इच्छा असल्यास मुक्त करण्यात येईल ; परंतु, प्रत्येक इनाम देणगीच्या बाबतीत अशा विकल्पाचा उपयोग करण्याची फक्त एकदाच संधी देण्यात येईल.

**वंश-परंपरागत हिंदू उपाध्यायाच्या किंवा त्याच्या तबदीलदाराच्या हक्कांस कोठपर्यंत बाध येतो.**

६. यात जी मर्यादा निर्दिष्ट केली आहे ती, खेरीजकरून, वंशपरंपरागत हिंदू उपाध्यायाकडे किंवा त्याच्या तबदीलदाराकडे त्याच्या पदासंबंधीची कोणतीही कामे करण्याबद्दल त्याच्या पदास संलग्न असलेल्या इनाम जमिनीवरील अगर नक्त नेमणुकीवरील त्याच्या किंवा त्याच्या तबदीलदाराच्या हक्कांस या अधिनियमातील कोणत्याही तरतुदीमुळे बाध येणार नाही.

एच-५९-६,०८२ पु-११.२००६
शासकीय मुद्रणालय, कोल्हापूर